महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्रराज्य, मुंबई
यांचेकार्यालय तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई-४००००२
GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF FISHERIES
COMMISSIONER OF FISHERIES, MAHARASHTRA STATE,MUMBAI
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road,Charni Road (W), Mumbai 400002
दूरध्वनी क्र.२२८२१२३९ Tel.No.22821239
Email :-commfishmaha@gmail.com Website:-http://fisheries.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४२२३७/४६/२०२३ दिनांक :३० /०५/२०२३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दाखल करण्यात आलेले प्रथम अपिल सुनावणी आदेश.**

**(प्रथम अपिल क्र. २/२०२३)**

श्री. संपत वामन पवार : अपिलार्थी
रा. हिरेनगर, पो. हिसवळ (बु),
ता. नांदगांव, जि. नाशिक

**विरुद्ध**

जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,
नाशिक विभाग, नाशिक

**१. अपिलाची पार्श्वभुमी :**

श्री. संपत वामन पवार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक १३/०४/२०२३ च्या अर्जान्वये ( प्राप्त दिनांक १८/०४/२०२३) प्रथम अपिल दाखल केले आहे. सदर प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०५/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणी बाबतची नोटीस संबधीतांना जा.क्र. मत्स्य/प्रशा/१४२२३८/४६/२०२३, दिनांक २६/०४/२०२३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक, श्री. सं. पां. वाटेगांवकर सुद्धा उपस्थित होते.

२. अर्जदार यांचे म्हणणे पुढील प्रमाणे :

श्री. संपत वामन पवार यांनी दिनांक २७/०२/२०२३ रोजीचा अर्ज (प्राप्त दि. २८/०२/२०२३) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत सादर केला होता. सदर अर्जान्वये, त्यांनी "आपल्या कार्यालयात कलम ४ ची अंमलबजावणी केली जात असल्याची सविस्तर कलम ४ (१) (ख) मधील १ ते १७ मुद्दयांची माहिती देणेबाबत" मागणी केली होती. उपरोक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी सुनावणीपुर्वी त्यांचे लेखी म्हणने सुनावणीकरिता सादर केले आहे. अर्जातील विषया संदर्भात माहिती अपिलार्थीस

व्यक्तीश: दिनांक २८/०३/२०२३ रोजी (माहिती अधिकार अर्ज प्राप्त दिनांकाअपासुन २९ व्या दिवशी) अदा करण्यात आली असल्याचे नमुद केले आहे. तथापि, अर्जदाराने दि. १३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकाराअंतर्गत प्रथम अपिल केले. त्यावर सुनावणी दरम्यान सुरूवातीस प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना त्यांचे अर्जातील नमूद मुद्दयांनुसार म्हणणे मांडण्यास सांगितले. त्यावर त्यांनी सदर माहिती मला मिळाली नाही, असे सांगितले.

३. गैरअर्जदार, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांचे म्हणणे पुढील प्रमाणे :

त्यावर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी नमुद केले की, अर्जदार यांनी माहिती अर्जान्वये केलेल्या मागणीनुसार अर्जदार यांना विहीत मुदतीत, माहिती बाबत पत्र पाठविण्यात आलेले आहे. तसेच याबाबतच्या पत्राची पोच सुनावणी दरम्यान निदर्शनास आणून दिली.

वरील अपिलाची पार्श्वभुमी व वस्तुस्थिती विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी पुढील निष्कर्षाप्रत होतात.

## निष्कर्ष

प्रकरणाची कागदपत्रे आणि सुनावनीच्या वेळी करण्यात आलेले युक्तिवाद यांचा विचार करता असे दिसुन येते की,

१. अपिलार्थीनी केलेल्या मूळ माहीती अर्जाच्या अनुषंगाने मुदतीत दिनांक २७/०३/२०२३ च्या पत्रान्वये अर्जदार यांना माहिती संदर्भात पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहीत कालावधीमध्ये कार्यवाही केली आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली असल्याने कलम ७ (१) (अ) चे उल्लंघन झालेले नाही.

३. माहिती वेळेत दिली असल्याने अपिल अर्जात नमूद इतर शास्तीबाबत कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

## आदेश

मी, श्री. यु. आ. चौगले प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई, दि.१०/०५/२०२३ रोजी घेतलेल्या प्रथम अपिल सुनावणीचा आदेश पुढील प्रमाणे पारीत करीत आहे.

१. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४ (१) (ख) मधील १७ मुद्यांपैकी १४ मुद्यांची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर आजमितीस उपलब्ध आहे. उर्वरीत तीन मुद्यांची माहिती मुख्य कार्यालयस्तरावर विभागाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही पूर्ण होताच जनमाहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी अर्जदारास लेखी कळविण्यात यावे.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी केंद्रिय माहिती अधिनियम २००५ नुसार माहिती बावत अर्जदारास विहीत कालावधीत लेखी कळविले आहे. तरी अपिलार्थी यांनी दाखल केलेले प्रथम अपिल क्र. २/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

३. या निर्णयामुळे समाधान न झाल्यास, खालील प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ९० दिवसांच्या आत द्वितीय अपील दाखल करता येईल.

मा. राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक.
पिनॅकल मॉल, चौथा मजला,
त्र्यंबक नाका सिग्नल जवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२.

(यु. आ. चौगले)
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) श्री. संपत वामन पवार, रा. हिरेनगर, पो. हिसवळ (बु), ता. नांदगांव, जि. नाशिक

२) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक.

३) निवडनस्ती.